मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# यिर्मया, रडका मनुष्य



लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Jonathan Hay

रूपान्तरकार: Mary-Anne S.

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2017 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

यिर्मया, यहुदा राज्यातील एका धार्मिक कुटुंबात जन्मास आला होता. त्याचे वडील हिल्कीया हे एक याजक होते. हे कुटुंब यरुशलेमेपासून जवळच असलेल्या अनाथोथ नावाच्या गावात राहात होते. यिर्मया देखिल याजक बनेल असे यिर्मयाच्या आईवडीलांना कदाचित वाटले असेल.
परंतू त्याच्यासाठी देवाकडे वेगळी योजना होती.





यिर्मयाच्या जन्माच्या वेळी, देवाचे लोक, देवाच्या वचनाप्रमाणे जिवन जगत नव्हते. जवळपास प्रत्येक जण; राजा पासून तर रंका पर्यंत सर्वच मुर्ति व खोट्या देवांच्या भजनी लागले होते – ऐवढेच नव्हे तर देवाच्या मंदिरात देखिल अन्य देवाची ते भक्ति करित होते !

यिर्मया
जेंव्हा तरुण
मुलगा होता
तेंव्हा परमेश्वर
त्याच्याशी
बोलला, "तुझा
जन्म होण्याच्या
आधिच तू मला
ठाऊक होतास,
आणि तूं माझ्यासाठी
बोलशील याची मी योजना केली."



परमेश्वराचे असे बोलणे यिर्मयाला घाबरविणारे असे होते. तेंव्हा तो म्हणाला, "अहो, प्रभू परमेश्वर, पाहा, मला बोलावयाचे ठाऊक नाही; मी केवळ बाळ आहे."



तो विस वर्षांचा होता – तो बाळक राहिलेला नव्हता. परंतू त्याच्या आजूबाजूला असलेल्या दुष्ट लोकांबरोबर तो देवाच्या वतीने बोलू शकेले असे यिर्मयाला वाटत नव्हते.


"घाबरु नको" असे म्हणत परमेश्वराने यिर्मयाला धिर दिला.
"ज्या कोणाकडे मी तुला पाठविन त्याजकडे तूं जा व तुला आज्ञापीन ते बोल."

तुझा बचाव करण्यास मी तुझ्याबरोबर आहे.



मग देवाने काहीतरी विशेष केले. देवाने यिर्मयाच्या मुखाला स्पर्श केला.

देवाने यिर्मयाला धैर्य, शक्ति आणि शहाणपण दिले. त्याने मोठ्याने ओरडून संदेश दिला, देव  लोकांवर प्रीति करतो  आणि तो त्यांना मदत करु इच्छितो याची त्याने त्यांना आठवण करुन दिली. परंतू कोणीही त्याचे ऐकले नाही. राजाने देखिल त्याचे ऐकले नाही.



ऐवढेच नव्हे तर याजकांना देखिल त्याचा राग आला
आणि त्यांनी त्याला देवाविषयी न बोलण्याचे सांगितले.
यिर्मया सत्य सांगत नाही असे सांगून
त्याच्यावर खोटे
आरोप करणारे
तेथे काही
खोटे संदेष्टे
देखिल
होते.



जवळपास शंभर वर्षे आधि उत्तरे कडिल इस्त्राएल राज्याने परमेश्वराला सोडून दिले होते, याची यिर्मयाने लोकांना आठवण करुन दिली. अश्शुर, या त्यांच्या शत्रूंनी, त्यांचा पाडाव केला आणि सर्व इस्त्राएल लोकांना त्यांच्या मायभूमिपासून दुर देशी नेले.




आता दक्षिणेकडील
यहुदाच्या लोकांनी, परमेश्वराला
सोडले होते. अरामी सैन्याने
आधिच त्यांच्याकडे कुच
केले होते ! देव त्याच्या
लोकांना पराभूत होऊ
देईल का आणि यांना देखिल
बंदिवासात नेऊ देईल का?

लोकांनी त्यांच्या मुर्तिंवर भरोसा केला. मुर्ति त्यांना त्यांच्या शत्रूंच्या हातून सोडविल काय? नाही ! केवळ परमेश्वरच त्यांना सोडवू शकतो. लोकांना यिर्मयाचा फार राग आला, त्यांनी त्याला जिवे मारण्याची योजना आखली. परंतू देवाने त्याच्या सेवकाचे संरक्षण केले.



अखेरिस परमेश्वराने असे काही तरी सांगितले त्याच्यामुळे यिर्मयाला धक्काच बसला. परमेश्वराने त्याला म्हटले, "या लोकांसाठी तूं प्रार्थना करु नकोस. जेंव्हा ते मदतीसाठी माझा धावा करतील तेंव्हा मी त्यांचे ऐकावयाचे नाही."



बाबेलच्या सैन्यासंगती होणाऱ्या युध्द्रात तूं हारणार आहे अशी यिर्मयाने यहुदाच्या राजाला चेतावणी दिली. राजाला त्याचा फार राग आला आणि त्याने यिर्मयाला तुरुंगात टाकले. तुरुंगात असतांना देखिल यिर्मया संदेश देत परमेश्वरावर भरोसा करित राहिला.



तुरुंगातून बाहेर आल्यावर देखिल यिर्मयाने राजाला व लोकांना त्यांच्या पापापासून मागे फिरुन परमेश्‍वरावर भरोसा करण्याचा संदेश दिला.

यावेळी राजाला फारच राग आला, त्याने यिर्मयाला एका खोल अशा चिखलाने भरलेल्या अंधार कोठडीत उतरवले.



परंतू परमेश्वराने राजाच्या अंतःकरणात कार्य केले. त्याने गुप्तपणे यिर्मयाची सुटका केली आणि आता त्याने काय करावे अशी देवाची इच्छा आहे असे यिर्मयाला विचारले.

तो म्हणाला, "बंदिवासात जा, आणि तूं जिवंत राहशील असे परमेश्वर म्हणतो."



बाबेलच्या सैन्याने यरुशलेम तसेच सर्व यहुदा काबिज केले. त्यांनी सर्व भिंती आणि इमारती जमिनदोस्त केल्या आणि सर्व घरे आग लावून जाळून टाकली.



त्याचे लोक सत्तर वर्षे बंदिवासात जातील आणि त्यानंतर त्यांना तो अभिवचनाच्या देशात परत आणील असे परमेश्वराने म्हटले होते.



# यिर्मया, रडका मनुष्य

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

यिर्मया

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर ईश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची इच्छा अशी आहे की आम्ही त्याला ओळखावे.

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे, पण ईश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याने तुमच्या पापांसाठी शिक्षा मिळावी आणि क्रॉसवर मरण यावे म्हणून त्याच्या एकुलत्या पुत्राला येशूला पाठविले. नंतर येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गातल्या घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

जर हे सत्य आहे यावर तुम्ही
विश्वास ठेवता, तर ईश्वराला हे सांगा:

प्रिय येशू, तू ईश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मृत्यू भोगण्यास मनुष्य बनलास आणि आता तू पुन्हा जगतोस यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एक दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी निघेन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!

जॉन 3:16